1F4 **D1**

**D.El.Ed. Examination**

**JUNE, 2017**

**First Year (2016 Revised Syllabus)**

**PROFICIENCY IN MARATHI (Part I)**

**Time : 11.00 to 1.00 Hrs.**

**Date : 5/6/2017** **(3 Pages)** **Max. Marks : 40**

1. (अ) परस्पर सहसंबंध ओळखा : 2

(1) श्रवण : रेडिओ : ? : स्पिकर

(2) स्वर : इ : ? : ज्ञ

(ब) वाक्यपूर्ती करा : 3

(1) अति शहाणा त्याचा ..................

(2) ध्वनिमय शब्दांद्वारे विचारांचे प्रकटीकरण म्हणजेच ..................

(3) संप्रेषणाचे दोन प्रकार ..................

(क) प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा : 3

(1) व्याकरण म्हणजे काय ?

(2) भाषा विकासाची चार कौशल्ये कोणती ते लिहा.

(3) सर्वनाम म्हणजे काय ?

2. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *60* ते *80* शब्दांत लिहा :** 8

(1) विद्यार्थ्यांच्या भाषणातील एकसुरीपणा घालवण्यासाठी तुम्ही कोणते **दोन** उपाय सुचवाल ?

(2) मानवी घटकांचा भाषिक अभ्यास करणाऱ्या विविध शाखा कोणत्या ते लिहा.

(3) श्रवण क्षमता विकसित करण्याकरता सुस्वर वाचन या उपक्रमाचा वापर करण्याकरता 10 ओळींचा उतारा लेखन करा.

(4) प्रमाणभाषा व बोलीभाषा भेद स्पष्ट करण्याकरता पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन (P.P.T.) तयार करा. (**दोन** स्लाईड)

3. **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *120* ते *160* शब्दांत लिहा :** 12

(1) श्रवणाचे महत्त्व सांगून श्रवणासंबंधीचे पाळावयाचे शिष्टाचार लिहा.

(2) व्याकरणाचे नियम विद्यार्थ्यांना पटवून देण्याकरता कोणतेही **तीन** तक्ते तयार करा.

**किंवा**

संप्रेषण म्हणजे काय ? संप्रेषण प्रक्रिया यशस्वी होण्याकरता तुम्ही कोणते उपक्रम राबवाल ?

(3) मराठी भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

(4) कविता गायनातून श्रवण कौशल्य विकास साधण्याकरता शिक्षक म्हणून कोणते उपक्रम राबवाल ?

**किंवा**

भाषण कौशल्याचा विकास करण्यासाठी अनौपचारिक संभाषणाचा नमुना तयार करा. (डॉक्टर आणि रुग्ण)

**4. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *200* ते *250* शब्दांत लिहा :** 12

(1) शब्दांच्या जाती किती ते सांगून अविकारी जाती स्पष्ट करा.

(2) शब्दसंपत्तीवर प्रभुत्व संपादन करण्यासाठी समानार्थी व विरुद्धार्थी प्रत्येकी 20 शब्दांची यादी तयार करा.

(3) वर्ण म्हणजे काय ? त्याचे प्रकार कोणते ते सांगून त्यांची उच्चारस्थाने स्पष्ट करा.

**किंवा**

शिक्षकाच्या दृष्टीने भाषणाचे महत्त्व सांगून भाषणाचे तंत्र स्पष्ट करा.